महाॲग्री-एआय धोरण २०२५-२०२९ अंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रीटेक नाविन्यता केंद्र (AIAIC) येथे "व्यवस्थापकीय संचालक" पदास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : पदनि-२०२५/प्र.क्र.२३४/१३-अे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १८ ऑगस्ट २०२६

वाचा:- १. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. पदनि-२०२५/प्र.क्र.२३४/१३-अे, दि. १९ जून २०२६.
२. दि. २० मार्च २०२६ रोजी झालेल्या उच्च स्तरीय सचिव समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना:-

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या "शेतकरी-केंद्रित" वापरास प्रोत्साहन देण्यासाठी आणि कृषि क्षेत्रात गतिमान परिवर्तन घडवून आणण्यासाठी "महाॲग्री-एआय धोरण २०२५-२९" राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृषि विभागाच्या सचिवांच्या थेट नियंत्रणाखाली राज्य स्तरावर सर्वोच्च कार्यालय म्हणून 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रीटेक नाविन्यता केंद्र' (AIAIC) ची स्थापना करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या कार्यालयासाठी उच्च स्तरीय सचिव समितीच्या दि.२० मार्च २०२६ रोजीच्या बैठकीत एकूण ३५ पदांच्या आकृतिबंधास मंजूरी दिली आहे. त्यापैकी ३४ पदांना संदर्भ क्र. १ येथील दि. १९ जून २०२६ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली असून उच्च स्तरीय सचिव समितीच्या निर्देशानुसार "व्यवस्थापकीय संचालक" या पदासाठी मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर स्वतंत्र आदेश काढण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

त्याचप्रमाणे, AIAIC हे कार्यालय राज्य स्तरावरील धोरणात्मक निर्णय, खरेदी प्रक्रिया, बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ व्यवस्थापन आणि ४ राज्य कृषि विद्यापीठांमधील AI^3 केंद्रांचे संनियंत्रण करणारे राज्यस्तरीय कार्यालय म्हणून काम करणार आहे. या कार्यालयातील संमिश्र (तांत्रिक व शासकीय) मनुष्यबळावर प्रभावी प्रशासकीय नियंत्रण ठेवण्यासाठी आणि धोरणाची अंमलबजावणी वेळेत पूर्ण करण्यासाठी "व्यवस्थापकीय संचालक" या पदाला मान्यता तसेच 'विभाग प्रमुख' दर्जाचे वित्तीय व प्रशासकीय अधिकार देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

महाॲग्री-एआय धोरणाच्या (२०२५-२०२९) राज्यस्तरीय अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रीटेक नाविन्यता केंद्र', मुंबई या कार्यालयाचे प्रमुख म्हणून "व्यवस्थापकीय संचालक" हे पद अस्थायी स्वरूपात निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर पद मंत्रालयीन सह सचिव/उप सचिव अथवा समकक्ष दर्जाच्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीद्वारे भरण्यात येईल.

३. सदर पदाला वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ अन्वये 'विभाग प्रमुख' पदाचे पूर्ण प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

४. व्यवस्थापकीय संचालक हे पद निर्माण केल्यामुळे आता या धोरणांतर्गत मंजूर असलेल्या एकूण पदांची संख्या ३५ (१ व्यवस्थापकीय संचालक + ३४ पूर्वी मंजूर पदे) झाली असून, संपूर्ण ३५ पदांचा एकत्रित व सविस्तर मंजुरी तक्ता 'परिशिष्ट-अ' म्हणून या शासन निर्णयासोबत जोडण्यात येत आहे.

५. व्यवस्थापकीय संचालक या पदाचा वेतनादी खर्च खालील नमूद लेखाशीर्षाखाली केलेल्या वार्षिक तरतुदीतून भागविण्यात याव्यात:

मागणी क्र. डी-३,
२४०१-पीक संवर्धन,
(००) (११३) कृषि अभियांत्रिकी,
(०१) महाराष्ट्र कृषि कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण (१००% राज्य योजना) (कार्यक्रम),
(२४०१ बी ६८९) - ०१ वेतन

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने आणि अनौपचारिक संदर्भ क्र. १४१/२०२६/आपुक दि. २७.०५.२०२६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१८११४७५९५६४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SMITA PRASAD JOSHI
Date: 2026.08.18 11:53:52 +05'30'

(स्मिता जोशी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,

२. मा. राज्यसभा/लोकसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य,
३. मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/ विधानसभा, विधानमंडळ, मुंबई,
४. सर्व विधानपरिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य,
५. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास), महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. उपमुख्यमंत्री (अल्पसंख्यांक), महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. मा.मंत्री (कृषि), कृषी व पदुम विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
११. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई
१४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. संचालक (नियोजन व प्रक्रिया), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६.संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१८. संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९. कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
२०. कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
२१. कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
२२. कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
२३. विभागीय कृषी सहसंचालक (सर्व),
२४. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (सर्व)
२५. कृषि आयुक, (अे जी १० सेल) महाराष्ट्र राज्य, पुणे (खर्च ताळमेळ शाखा),
२६. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
२७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२९. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
३०. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, न , नवी मुंबई
३१. उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
३२. वित्त विभाग (कार्यासन व्यय १/ अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई
३३. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१) मंत्रालय, मुंबई,
३४. अवर सचिव /कक्ष अधिकारी, सर्व कार्यासन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
३५.निवड नस्ती (का. १३ अे)

परिशिष्ट - अ

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रीटेक नाविन्यता केंद्र (AIAIC)

अ. क्र.	पदनाम व पदांचा संवर्ग आणि संबंधित प्रशासकीय विभागाच्या संवर्ग पदांमधून प्रतिनियुक्ती अथवा बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या मनुष्यबळ सेवांचा तपशील	वेतनश्रेणी / ठोक वेतन	मंजूर पदे	नियुक्ती पद्धत	
				प्रतिनियुक्ती	बाह्ययंत्रणेद्वारे
अ	कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रीटेक नाविन्यता केंद्र (AIAIC), मुंबई, (राज्य स्तर)				
१	व्यवस्थापकीय संचालक (मंत्रालयीन सह सचिव/ उप सचिव अथवा समकक्ष दर्जाचे पद) (प्रतिनियुक्ती)	एस -२५ (७८८००-२०९२००) अथवा त्यापेक्षा अधिक	१	१	०
२	Chief Technology Officer (कंत्राटी)	रु. ६० लाख प्रति वर्ष	१	०	१
३	लेखाधिकारी - वर्ग २ (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा) (प्रतिनियुक्ती)	एस-१६: रु. ४४९००-१४२४००	१	१	०
४	सहाय्यक लेखाधिकारी (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा) (प्रतिनियुक्ती)	एस-१५ रु. ४१८००-१३२३००	१	१	०
५	उप लेखापाल / रोखपाल (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वरिष्ठ लेखापाल संवर्गातील पद) (प्रतिनियुक्ती)	एस-१३ रु. ३५४००-११२४००	१	१	०
६	प्रशासकीय अधिकारी (मंत्रालयीन नियमित/निवृत्त अवर सचिव दर्जाचे पद अथवा नियमित /निवृत्त कक्ष अधिकारी)	एस-२३ रु. ६७७००-२०८७०० एस -१७ रु.४७,६००-१,५१,१००	१	१	०

अ. क्र.	पदनाम व पदांचा संवर्ग आणि संबंधित प्रशासकीय विभागाच्या संवर्ग पदांमधून प्रतिनियुक्ती अथवा बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या मनुष्यबळ सेवांचा तपशील	वेतनश्रेणी / ठोक वेतन	मंजूर पदे	नियुक्ती पद्धत	
				प्रतिनियुक्ती	बाह्ययंत्रणेद्वारे
७	सहायक कक्ष अधिकारी अथवा उच्च श्रेणी स्टेनोग्राफर (मंत्रालयीन संवर्ग) (प्रतिनियुक्ती)	एस-१६ रु. ४४९००-१४२४००	१	१	०
८	कार्यालयीन सहायक (Executive Assistant) (बाह्यस्त्रोत)	रु. ५०,००० /- पर्यंत ठोक वेतन	२	०	२
९	बहू कार्य कर्मचारी (Multitasking staff) (बाह्यस्त्रोत)	रु. ३५,००० /- पर्यंत ठोक वेतन	२	०	२
एकूण (अ)			११	६	५
ब	कृषि विद्यापीठ स्तर (AI³C)				
१०	AI/ML & Data Science Lead (बाह्यस्त्रोत)	रु.१,२५,००० /- पर्यंत ठोक वेतन	४	०	४
११	Geospatial & Remote Sensing Specialist (बाह्यस्त्रोत)	रु.१,२५,००० /- पर्यंत ठोक वेतन	४	०	४
१२	Robotics &IoT/Edge Computing Specialist (बाह्यस्त्रोत)	रु.१,२५,००० /- पर्यंत ठोक वेतन	४	०	४
१३	Industry & Startup Liaison (बाह्यस्त्रोत)	रु.१,२५,००० /- पर्यंत ठोक वेतन	४	०	४
१४	Junior Technical Fellows / Project Associates (बाह्यस्त्रोत)	रु.७०,००० /- पर्यंत ठोक वेतन	८	०	८
एकूण (ब)			२४	०	२४
एकूण (अ) + (ब)			३५	६	२९